**रे.दि.मू.नं. ७१/२००९ मधील नि. ६३ खालील आदेश**
**( बापू धायगुडे विरूध्द ज्ञानदेव कुंभार )**
**(आदेश पारीत दि. ०९/०४/२०१८)**

**१.** यातील अर्जदार उज्वला गणेश कुंभार, ओंकार गणेश कुंभार व संकेत गणेश कुंभार यांचे कथन असे आहे की यातील प्रतिवादी नं. १ ज्ञानदेव रामचंद्र कुंभार हे मयत असून त्यांना गणेश कुभार नावाचा मुलगा होता व तो ज्ञानदेव कुंभार मयत होण्यापूर्वीच मयत झालेला आहे. प्रस्तुत अर्जदार नं. १ ते ३ हे प्रतिवादी नं. १ ज्ञानदेव कुंभार यांचे वारस आहेत व त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक आहे. याउलट वादींचे कथन असे आहे की प्रस्तुत अर्जदार हे प्रतिवादी नं. १ मयत ज्ञानदेव कुंभार यांचे वारस असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**२.** दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. यातील अर्जदार नं. १ ते ३ यातील प्रतिवादी नं. १ मयत ज्ञानदेव कुंभार यांचे वारस आहेत किंवा नाहीत हा पुराव्याचा भाग असून तो पुराव्याअंती ठरणार आहे. तसेच यातील प्रतिवादी नं. १ ज्ञानदेव कुंभार यास गणेश कुंभार नावाचा मुलगा होता किंवा नाही हे सुध्दा पुराव्याअंती ठरणार आहे. सदर कारणामुळे प्रस्तुत दुरूस्ती नाकारणे योग्य वाटत नाही.

**३.** वादीच्या वकीलांनी युक्तीवाद असा केला की, प्रस्तुतचा दावा मनाई आदेशासाठी दाखल केलेला आहे व ज्या व्यक्ती वादीला हरकत अडथळा करतात त्यांना पक्षकार केलेले आहे, त्यामुळे यातील प्रतिवादी नं. १ च्या संपूर्ण वारसांना दाव्यात पक्षकार करणे आवश्यक नाही. याउलट नि. ६३ मधील अर्जदारांचे कथन असे आहे की अर्जदार हे वादमिळकतीत वारसाहक्काने राहत असून ते वादमिळकतीचा उपभोग घेत आहेत. यावरून अर्जदाराचे कथन असे आहे की ते वादमिळकतीत राहत आहेत. सदरचा दावा मनाई आदेशासाठी असल्याने त्यामध्ये कब्जा व वहिवाटीबाबतचा मुद्दा ठरवावा लागतो व त्यामुळे प्रस्तुत अर्जदार यांना सदर दाव्यात समाविष्ठ करून वर नमूद केलेली दुरूस्ती

करणेस मंजूरी देणे न्यायोचीत वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ६३ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादीने प्रस्तुतची दुरूस्ती विहीत कालावधीत करावी.

३. प्रस्तुतचा दावा सन २००९ सालचा आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी नं. १ ते ५ तर्फे एकच वकीलपत्र आहे. यातील प्रतिवादी नं. १ मयत असल्याबाबत व त्यांचे संपूर्ण वारसांची माहिती यातील प्रतिवादींना माहित होती, परंतू नि. ६३ मधील अर्जदार पूर्वी सामील का झाले नाहीत याचे समर्थनीय कोणतेही कारण प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केलेले नाही, त्यामुळे सदर दाव्याचे कामकाज लांबलेले आहे. अशा परिस्थीतीत माझयामते सदरचे कामकाज लांबविणेसाठी नि. ६३ मधील अर्जदाराने विलंभ केलेला आहे त्यामुळे खर्चाबाबत आदेश करणे योग्य वाटते. सबब नि. ६३ मधील अर्जदाराने यातील वादींना रक्कम रूपये ५००/— कॉस्ट द्यावी.

**दि. ०९/०४/२०१८**

**(डी.एम.गिरी)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा.**